स्थायीत्वाचा लाभ मंजूर करणे बाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.साजिप/ साप्रवि-आस्था 2(5)/1342 /2019 दिनांक 30/9/2019
05/10/2019

परिपत्रक

महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही/1075-10/दिनांक 19.09.1975 नुसार शासकीय कर्मचारी यांना कायमपणाचे (स्थायीत्वाचे ) लाभ देणेसाठी काही अटींची अर्हता पाहून स्थायीत्वाचा लाभ मंजूर करणेची तरतूद आहे.

जिल्हा परिषद सेवकांचे स्थायीत्वाचे लाभ मजूरी करीता सादर करताना शासनाचे दिनांक 19.09.1975 च्या शासन निर्णयानुसार घालून दिलेल्या अटीनुसार परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात येत नसल्याने बरेच प्रस्ताव पुर्ततेसाठी परत पाठवावे लागत असल्याने ब-याच प्रस्तावांना मंजूरीस विलंब होत असल्याचे दिसून येत आहे. ही बाब टाळणे आवश्यक असून प्रस्ताव परिपूर्ण सादर करणेसाठी प्रस्तावासोबत खालील बाबी प्रामुख्याने असल्याची खात्री करुन प्रस्ताव सादर करणेची दक्षता घ्यावी.

| अ.न. | दि.19.09.1975 चे शासन निर्णयानुसार आवश्यक अट | पूर्ततेसाठी आवश्यक कागदपत्र |
|---|---|---|
| 1 | शासकीय कर्मचारी यांची मुळ नियुक्ती, ही त्या पदाचे किंवा संवर्गाचे सेवाप्रवेश नियमानुसार झाली असेल व त्याची नियुक्ती भरती नियमांच्या विहीत कार्यपध्दतीनुसार झाली असेल. | 1. संबधीत संवर्गाचे खाते प्रमुख यांचे तशा आशयाचे प्रमाणपत्र<br>2. मुळ नियुक्ती आदेशाची प्रत |
| 2 | शासकीय कर्मचारी याने संबधीत पदास वैद्यकीयदृष्टया पात्र असले बाबतचे सक्षम वैद्यकीय प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर केले असेल व त्याने त्यास विहीत केलेली विभागीय परीक्षा व चाचणी उत्तीर्ण केली असेल. | 1. सेवापुस्तकातील वैद्यकीय प्रमाणपत्राची सत्य प्रत<br>2. सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण / सुट<br>3. लेखा लिपीक परीक्षा उत्तीर्ण / सुट<br>4. संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण / सुट<br>5. तांत्रिक पदासाठी व्यवसायीक परीक्षा उत्तीर्ण / सुट<br>6. मराठी /हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण / सुट<br>7. पदासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पूर्ण<br>8. नोंदणी प्रमाणपत्र (उदा. आरोग्य सेविका, औषध निर्माण अधिकारी ) |
| 3 | शासकीय कर्मचारी यांचे शासकीय सेवेमधील वर्तन चांगले असेल. | ज्या तारेखस स्थायीत्व लाभ द्यरवयाचा आहे त्या तारेखपुर्वीचे मागील तीन वर्षाच्या गोपनीय अहवालातील शेरे व अभिप्राय |
| 4 | नेमणूक आदेशातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आली आहे काय ? | होय / नाही |
| 5 | संबधीत कर्मचारी यांचा परिक्षाधिन कालावधी उठविण्यात आला आहे काय ? | होय / नाही |

Scanned by CamScanner

सदरील बाबींची अर्हता संबधीत कर्मचा-यांनी पात्र करणे आवश्यक असून त्यानुसार पडताळणी करुन खालील विवरणपत्र प्रस्तावा सोबत जोडणेत यावे.

## विवरणपत्र

| अ.न. | जेष्ठता यादीतील क्र. | कर्मचा-यांचे नांव | मुळ नियुक्ती पदनाम | नियुक्ती दिनांक | परिविक्षाधिन कालावधी समाप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| सेवेत 3 वर्ष पूर्ण झाल्याचा दिनांक | संबधीताची सेवा परिक्षा भरती नियमानुसार झाली किंवा नाही. | नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबधीतांनी पूर्ण केली किंवा नाही. | वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र संबधीतांनी सादर केले किंवा नाही. | सेवाप्रवेशोत्तर परीक्षा /संगणक परीक्षा संबधीत उत्तीर्ण झाले आहेत किंवा नाही. | मागील 3 वर्षाचे गोपनीय अहवाल समाधानकारक आहेत किंवा नाहीत. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | | |

ठिकाण -

कार्यालय प्रमुखांची सही

दिनांक ---

वरील प्रमाणे स्थायीत्वाचा लाभ देणे प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेवून पात्र प्रस्ताव विनाविलंब सादर करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांनी घेण्यात यावी.

(संजय भागवत, म.ना.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा
# 9422993333
ceozpstr@gmail.com

प्रति,

1. खाते प्रमुख , सातारा जिल्हा परिषद (सर्व)
2. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
3. गट शिक्षणाधिकारी , पंचायत समिती (सर्व)
4. बाल विकास प्रकल्प अधिकारी , ए.बा.वि.से.यो. (सर्व)
5. उप अभियंता बांधकाम / ग्रामीण पाणी पुरवठा / लघुपाटबंधारे उप विभाग (सर्व)
6. तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती (सर्व)
7. वैदयकिय अधिकारी , प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)
8. प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा
9. मुख्याध्यापक प्रतापसिंह हायस्कूल सातारा

Scanned by CamScanner